# प्रेसनोट

## '' पोलीस विभाग विभाग व उपप्रादेशिक परिवहन यांचा रस्ता सप्ताह अभियाना अंतर्गत मोटार सायकल रॅली''

जा.क्र. २१२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०४/२०१८

भंडारा:— २९ वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह तथा महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०१८ पंधरवाडा कार्यक्रमा अंतर्गत पोलीस विभाग व उपप्रादेशिक परिवहन विभाग यांचे संयुक्त विद्यमाने दिंनाक २४/०१/२०१८ रोजी मोटार सायकल हेल्मेंट घालुन रॅली काढण्यात आली. रस्ता सुरक्षा अंतर्गत विवीध उपक्रमाचे आयोजन पोलीस विभाग व परिवहन विभाग यांच्या माध्यमातुन करण्यात आले आहे. लोकामध्ये जागृतता निर्माण होवुन अपघात नियत्रंणावर आळा घालता यावे व रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमीत्ताने सुरक्षीत रस्ता प्रवासाचा संकल्प केल्यास अपघाताचे प्रमाण निश्चीत कमी होवुन अनेक नागरीकांचे बहुमुल्य जीव वाचविण्यास मदत होईल. या उद्देशाने मोटार सायकल हेल्मेंट रॅलीला मा. विनीता साहू पोलीस अधीक्षक भंडारा यांनी हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात केली.

भंडारा शहरात मोटार सायकल हेल्मेंट रॅली मार्ग— उपप्रादेशिक परिवहन विभाग भंडारा ते मुस्लीम लायब्ररी – खामतलाव ते शास्त्री चौक –गांधी चौक – पोस्ट ऑफीस चौक – परिवहन विभाग असा होता.

मा. विनीता साहू, पोलीस अधीक्षक भंडारा, रश्मी नांदेडकर अपर पोलीस अधीक्षक भंडारा, कुलकर्णी पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा, राजेन्द्र वर्मा उपप्रादेशीक अधीकारी भंडारा सपोनि. पोटे, प्रभारी वाहतुक शाखा भंडारा, तसेच मोटार सायकलवर आरसीपी पथक, दामीनी पथक, पोलीस विभागातील कर्मचारी व उपप्रादेशिक विभागाचे कर्मचारी हे उपिस्थत होते.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ०७१८४२५४७०१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.